p2

परिवहन आयुक्त कार्यालय,
प्रशासकीय इमारत,३रा व ४था मजला,
सरकारी वसाहत,वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०००५१.

## : निविदा सूचना :

परिवहन आयुक्त कार्यालय, वांद्रे येथील तिस-या व चौथ्या मजल्यावरील प्रत्येकी ०३ प्रमाणे एकूण ०६ प्रसाधन गृहांची साफसफाई इत्यादि कामांकरिता मनुष्यबळ आणि साहित्य/सामग्री पुरविण्यासाठी सन २०१३-१४ या वर्षासाठी बंद निविदा विहित नमुन्यातील निविदा फॉर्मवर मागविण्यात येत आहेत. या निविदा फॉर्मची किंमत रु.५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) इतकी असून ते परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत,३रा व ४था मजला, सरकारी वसाहत,वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ येथे दिनांक १७.०१.२०१३ पासून दिनांक ३०.०१.२०१३ पर्यंत उपलब्ध होतील. निविदेतील कामाचे स्वरुप व अटी/शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. कार्यालयाच्या तिस-या व चौथ्या मजल्यावरील सर्व शाखा, परिसर कार्यालयातील वेळेपूर्वी म्हणजे सकाळी ९.३० पर्यंत झाडून सफाई करणे.

२. कार्यालयातील फरशा डिटर्जंट/फिनाईल मिश्रित पाण्याने दररोज साफ करणे.

३. कार्यालयातील ०२ पुरुष, ०२ महिला व ०२ अधिकारी अशी एकूण ०६ प्रसाधनगृहे डिटर्जंट व फिनेल वापरुन दिवसातून तीन वेळा म्हणजे सकाळी ९.३० पूर्वी दुपारी १.०० पूर्वी व सायंकाळी ४.०० पूर्वी साफ करणे. सर्व प्रसाधनगृहात डांबर गोळया टाकणे, दिवसातून तीन वेळा लिक्विड साबण ठेवणे व मोऱ्या तुंबल्यास त्या साफ करणे. साफसफाई करीता लागणारे आवश्यक सर्व साहित्य ठेकेदाराने पुरवठा करणे बंधनकारक आहे.

४. कार्यालयातील मांडण्या व कपाटे रोज साफ करणे तसेच कार्यालयातील खिडक्या व दरवाजे साफ करणे.

५. कार्यालयातील खिडक्यांच्या काचा रसायन आणि पाण्याने साफ करणे व अधिकारी कक्षाचे दुभाजक आठवडयातून एकदा पाण्याने साफ करणे.

६. कार्यालयातील भिंती, छते आठवडयातून एकदा साफ करणे व कोळीष्टके काढून टाकणे.

७. कार्यालयातील सर्व दिवे/पंखे महिन्यातून एकदा साफ करणे.

८. कार्यालयात आलेले पावसाचे पाणी काढून कार्यालयीन जागा कोरडी करणे.

९. ठेकेदाराने आठवडयातून दोनदा कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन साफसफाईच्या कामासंदर्भातील अडचणीचे निवारण करणे.

१०. ठेकेदारास १८ वर्षापेक्षा जास्त वय असणारे स्थानिक कर्मचारी ( शासकीय धोरणानुसार) नियुक्त करावे लागतील. सदर कर्मचाऱ्यांपैकी महिला प्रसाधनगृहांच्या साफसफाईकरिता किमान २ महिला व एक पर्यवेक्षकीय कर्मचारी असणे आवश्यक आहे. सदर कर्मचारी पुर्ण वेळ ( ८ तास ) काम करणारे असावेत. तसेच कचरा गोळा करण्याची व्यवस्था ठेकेदारास स्वखर्चाने करावी लागेल व त्याची विल्हेवाट लावावी लागेल,

११. ठेकेदारास प्रासंगिक करार कामगार (नियंत्रण व निर्मूलन) कायदा, १९७० च्या सर्व अटी पाळाव्या लागतील. ठेकेदारास कामगारांची मंजूरी शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या किमान मजुरी/वेतन दरानुसार प्रासंगिक करार कामगारांना मजुरी शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या किमान रक्कमेच्या ३ टक्के किंवा कमाल रु.१०,०००/- अनामत रक्कम म्हणून दर्शनी धनाकर्षाने (Demand Draft) निविदेसोबत भरावी लागेल. धनाकर्षाऐवजी धनादेश स्विकारला जाणार नाही. निविदेसोबत अनामत रक्कम न भरल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही. धनाकर्ष " परिवहन आयुक्त, मुंबई " यांचे नांवे मुंबई येथे देय असलेला काढण्यात यावा.

निविदा **दोन** वेगवेगळया बंद लिफाफ्यात सादर करावी.

<u>लिफाफा क्रमांक (१)</u> (अ) तांत्रिक लिफाफामध्ये अनामत रकमेचा धनाकर्ष
(ब) पुर्वानुभवाबाबतची तपशिलवार माहिती
(क) अशा प्रकारची निविदा अन्यत्र सादर केली असल्यास त्याबाबतची माहिती

<u>लिफाफा क्रमांक (२)</u> दराचा लिफाफा मध्ये साफसफाईचा मासिक दर नमूद केलेला असावा असा देकार कोणत्याही अटी/शर्तीचे आधीन नसावा.